# पुणे तिथे काय उणे!

टेक्स्ट मेसेजच्या आवाजाने मला एकदम दचकून जाग आली. घर अगदी शांत शांत होते. खिडकीतून लख्ख उजाडलेले दिसत होते. एरवी दार जरा कुरकुरले तरी उठणारे आपण, इतका वेळ झोपून कसे राहिलो याचा मला अचंबा वाटला. नाही म्हणजे दूधवाला, पेपरवाला, भांडी घासायला अगदी पहाटे येणारी रुक्मिणी या सगळ्यांचे आवाज अजिबात कसे ऐकू नाही आले आपल्याला?

टेक्स्ट मेसेज प्रियाचा होता. "स्वारी अजून उठली की नाही" अशी चौकशी करणारा.

बेडरूमचे दार उघडून मी जिन्याने खाली गेलो तर आई बाबा शांतपणे पेपर वाचत सोफ्यावर बसले होते. एरवी माझा आवाज ऐकताच पेपर टाकून उठणारी आई पेपर बाजूला न करता म्हणाली, "दिनकर, उठलास का बाळ? जा आपला आपण उपमा खाऊन घे. की आज पण ब्रेकफास्ट मिटींग आहे?"

मी चकित झालो. आई "आपलं आपण खा" म्हणतेय? नाहीतर एरवी मी कुकुलं बाळ नाहीतर औंधचा राजा असल्याप्रमाणे सारखी माझी उठल्या-बसल्या सेवा करत असते. आणि त्यावर "जरा स्वावलंबन शिकवा युवराजांना" अशी बाबांची टिप्पणी चालू असते. आज मात्र आईच स्वावलंबन शिकवत होती!

"आई, आज काही संप वगैरे आहे का गं? दूधवाला, रुक्मिणी कुणीच कसे आले नाहीत?"

"असं का म्हणतोस? येऊन गेले सगळे आपापली कामे करून." आई पेपर बाजूला करीत माझ्याकडे आश्चर्याने पहात म्हणाली.

"काय सांगतेस? मला काहीच आवाज नाही ऐकू आले."

"अरे दिनकर, आवाज करायला ते काय लग्नातले बॅंडवाले आहेत का? नेहमीप्रमाणे शांतपणे कामे करून गेले ते!" बाबांनी त्यांचे विनोदी पिल्लू सोडले.

"अच्छा?!" नंदीबैलासारखी मान हलवीत मी परत वर गेलो. १५-२० मिनिटांत तयार होऊन परत खाली आलो व आईला म्हणालो, "ओके आई मी निघालो. ग्रूप मिटींग आहे माझी वाडेश्वरमधे."

"सांभाळून जा. गाडी फार जोरात चालवू नकोस रस्ते चांगले आहेत म्हणून. दंड होईल तुला ट्रॅफिक कॅमेऱ्यावर सापडलास तर." आई म्हणाली, व मग स्वैपाकघरात नुकत्याच आलेल्या शांताबाईंशी जेवायला काय काय करायचे याची चर्चा करू लागली.

दंड काय! ट्रॅफिक कॅमेरा काय! आईच्या या चमत्कारीक वाक्यावर विचार करत मी माझी वॅगन-आर गाडी सुरू केली. आज काहीतरी गडबड आहे खास!

पुष्पलता सोसायटीच्या गेटपाशी बसलेल्या हेमंत वॉचमनला (आजकाल वॉचमन लोकांची नावे पण अशी भारीतली असतात) हात करत मी बाहेर पडलो व कमिशनर गल्लीतून गाडी हाकत विद्यापीठ रस्त्याकडे निघालो. उजवीकडे चित्तरंजन वाटिकेत बरेच लोक वेगवेगळ्या वेगाने चालत होते आणि धावत होते. सर्व आकारमानाचे व वयोमानाचे लोक धापा टाकत पण उत्साहाने गतीमान झाले होते. आज मला थोडी गर्दी जास्तच वाटली. अचानक गल्लीतल्या सगळयांनाच व्यायामाची आवड लागली की काय?

“हाय दिनकर!”, मंजूळ परिचित आवाजात हाक आली. प्रिया तिच्या रोजच्या २० प्रभातफेऱ्या मारायला जॉगिंग सूट घालून लगबगीने वाटिकेकडे निघाली होती. तिला पाहून माझ्या हृदयात फुलपाखराने पंख पसरल्यासारखे मला वाटले. इतकी वर्षे प्रियाची आणि माझी मैत्री असूनही ती दिसली की मला असे नुकतेच प्रेमात पडल्यासारखे काहीतरी होतेच.

“अरे प्रिया तू?” असे म्हणत मी रस्त्यात मधेच गाडी थांबवू लागलो, तर ती लगेच डोळे मोठे करून म्हणते कशी, “अरे कुठेही काय थांबवतोस? नंतर भेटू ना आपण.” असे म्हणून ती गेलीदेखील.

नाईलाजाने मी गाडी चालवत राहिलो. पण ती असे का म्हणाली - ’कुठेही काय थांबवतोस?’ आज काय नियम न मोडण्याचा दिवस आहे की काय?

विद्यापीठ रस्त्यापाशी सिग्नलपाशी मी थांबलो. चौकात गाड्यांची गर्दी फारच कमी वाटत होती. हिरवा सिग्नल पडल्याबरोबर नेहमीच्या सवयीप्रमाणे लगेच मी माझ्यापुढच्या गाडीला उजवीकडून बगल देऊन कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतो तो समोर काळा-पिवळा फूटभर उंच रस्ता दुभाजक दिसला. वेळेत ब्रेक मारला म्हणून बरं नाहीतर आज वॅगन-आरचे दात पडण्याची वेळ आली होती. हा दुभाजक केव्हा बांधला बुवा? कालपर्यंत तर नव्हता! नाईलाजाने मी इतरांसारखा शिस्तीत पुढच्या वाहनाच्या मागोमाग गेलो.

विद्यापीठ रस्त्यावर ३ लेन्समध्ये वाहतुक छान शिस्तीत चालली होती. लेन्सच्या पांढऱ्या रेषा अगदी काल रात्रीच रंगवल्याप्रमाणे चमकत होत्या. कुणीच दोन लेन्सच्या मध्ये गाडी घुसवून एकमेकावर चढाई करण्याचा प्रयत्न करीत नव्हते. कुणाला पुढे जायची घाई दिसत नाही! काय ’वाहतुक सौजन्य दिन’ आहे की काय आज?

अशी सगळी नवनवीन आश्चर्ये बघत मी जंगली महाराज रस्त्यावर आलो. तिथेही परिस्थिती तीच. सगळे शांत शिस्तीत चालले होते. आणि विशेष म्हणजे रस्त्यावरचे सगळे खड्डे आणि त्यांच्या अनुषंगाने चाललेली दुष्काळी कामे गायब झाली होती.

वाऱ्याचा एक जोराचा झोत आल्याने मी चमकलो आणि माझ्या लक्षात आले की मी गाडीची खिडकी इतका वेळ उघडीच ठेवली होती. ’अरे बाप रे! मेलो आता इतका वेळ प्रदूषित हवा खाऊन.’ असा विचार करून मी पटकन काच वर करणार तेव्हढ्यात लक्षात आले की हवा तर खूपच स्वच्छ, उबदार,

आल्हाददायक, आणि सुगंधी अशी वाटत होती. रस्त्याच्या दोहों बाजूला बसलेले फुलवाले गुलाब, झेंडू, चाफा, अशी नाना प्रकारची फुले विकत होते, त्या फुलांचाच सुवास हवेवर तरंगत येत होता. आणि एरवी खिडक्या बंद ठेवून AC लावूनदेखील येणाऱ्या पेट्रोल, डिझेल, व्हॅसलिन असल्या वासांचा अजिबात मागमूस नव्हता. उलट फुलांच्या सुगंधात इतर चित्तवेधक वास मिसळत होते - जागोजाग असलेल्या स्टॉलवर बनणारे वडापाव, मिसळ, अमृततुल्य चहा अशा सगळ्यांचे. खिडकी तशीच उघडी ठेवून मी त्या मस्त धुंद हवेचे प्राणायाम केल्यासारखे दीर्घ श्वास घेत राहिलो.

डेक्कनच्या पादचारी क्रॉसिंगपाशी लाल सिग्नल होता. इथे नेहमी पकडापकडीचा खेळ खेळल्यासारखे पादचारी धावत सुटतात व जणू त्यांना धरायला गाडीवाले उत्सुक असतात. मीपण नेहमीप्रमाणे 'पादचारी आपलं आपण बघून घेतील' असा विचार करत तमा न बाळगता तसाच पुढे गेलो. तर काय! पांढराशुभ्र सदरा, इस्त्रीची खाकी पँट, व काळा सोनेरी फ्रेमचा गॉगल घातलेला रूबाबदार पोलीसमामा वाटच पाहात होता माझी. लगेच तो पुढे आडवा होत मला 'गाडी साईडला घ्या' अशी मंद हसत खूण करू लागला. “च्यायला. गेले तीनशे रूपये!” मी स्वत:शीच चडफडलो.

“काय साहेब! रस्ता फक्त गाड्यांसाठी नाही. पादचाऱ्यांनी काय करायचे तुम्ही अशी बेछूट गाडी चालवल्यावर?” मामा खिडकीवर दोन्ही हात ठेवीत म्हणाला.

“सॉरी, अहो मला लाल दिवा दिसलाच नाही. किती डिम झाला आहे तो!” मी थाप ठोकत जमेल तितका अपराधी चेहरा केला. “किती पैसे द्यावे लागतील?”

“म्हणजे फाईन म्हणताय? नाही, दंड करत नाही, फक्त वॉर्निंग देतोय यावेळी!” मामाने हात काढून घेत म्हटले. “जा आता सावकाश. आणि डोळे तपासून घ्या एकदा.”

मी आ वासून त्याच्याकडे पाहातच राहिलो. पुण्याचा पोलीस आणि काही पैसे न घेता सोडून देतोय, आणि तेही असे सभ्य भाषेत संभाषण करून? पण मग लगेच गाडी सुरू करून मी चालता झालो. न जाणो मी थांबलो तर थोड्या वेळाने त्याचे विचार बदलायचे!

एकंदरीत माझा वाडेश्वरपर्यंतचा प्रवास खूपच आगळावेगळा झाला. कोणी मधे घुसले म्हणून मला एकदाही गाडीचा हॉर्न वाजवावा लागला नाही, किंवा मला चाटून जाणाऱ्या मोटरसायकल अथवा बस चालकांना शिव्या हासडाव्या लागल्या नाहीत. वाडेश्वरपाशी अजून एक आश्चर्य माझी वाट पाहात होते. तिथे चक्क अंडरग्राउंड पार्किंगकडे जाणारा बाण दाखवला होता व ४० पैकी ११ जागा शिल्लक असल्याची चमकणारी इलेक्ट्रॉनिक पाटी होती! पुणे महानगरपालिकेने रातोरात हे पार्किंग खोदले की काय? वाडेश्वरला उजव्या बाजूला लागूनच असलेल्या त्या भुयारी मार्गाने मी गाडी घेऊन गेलो व ११ पैकी एक जागेवर गाडी लावून पायऱ्या चढत वर आलो.

आतापर्यंत एव्हढे सर्व अनपेक्षित धक्के सोसल्यानंतर वाडेश्वरमधे जायची मला खरे तर भीतीच वाटत होती. तिथे ऑलिव्ह गार्डनसारखे शिस्तबद्ध कस्टमर आणि नकली हसणारे वेटर दिसतात की काय अशी धास्ती वाटू लागली. पण वाडेश्वरमधे मात्र नेहमीचेच चित्र होते. लोकांचा गप्पा-गोंधळ चालला होता. डोश्या-इडल्यांसाठी लोक वेटर्सना हाका मारत होते. कुणी ओळखीचे दिसले की लोक बिनधास्त त्याच्या टेबलापाशी जाऊन हात टेकून विचारपूस करीत होते. मला हे दृश्य पाहून हायसे वाटले. सकाळी उठल्यापासून घेतलेले विचित्र अनुभव बहुतेक स्वप्नच असावेत किंवा मी अर्धवट झोपेत असल्यामुळे तसे वेगळे वाटले असावेत अशी मी स्वतःची समजूत घातली.

माझ्या मित्रांची नेहमीची टोळी आधीच एका टेबलापाशी गप्पा मारीत बसली होती. सगळे नग वेगवेगळ्या पोझमधे - काही पाय लांब पसरून, काही हात वर करून आळोखे-पिळोखे देत - असे बसलेले होते.

“दिन्या लेका, काय किती वेळ लावलास? रात्री झोपायला उशीर झाला काय?” एक डोळा मिचकावीत बिप्या ऊर्फ बिपीन विचारता झाला. बिप्याला सर्वांच्या नाईट लाईफमध्ये भलताच इंटरेस्ट. त्याच्या प्रश्नाला फक्त हसून उत्तर देत मी एक दूरची रिकामी खुर्ची ओढत बसलो व काय गप्पा चालल्या आहेत याचा अंदाज घेऊ लागलो.

“पण डिबेटची सुरूवात फार खराब केली मनमोहननी. किती सोपा प्रश्न टाकला होता मुलायमने!” ढिग्या ऊर्फ गिरीश म्हणाला.

मी उडालोच. “डिबेट? आणि मनमोहन आणि मुलायमची? काय बोलताय काय?”

सगळे माझ्याकडे चकित होऊन पाहू लागले. “दिन्या तू असे म्हणतोस?” पक्या ऊर्फ परीक्षित ’तू’ वर जोर देत म्हणाला. “काल दूरदर्शनवर नाही पाहिलीस दुसरी डिबेट? आणि आज आयपीआर वर केव्हढी चिरफाड चर्चा सुरू आहे सकाळपासून!”

"ही आयपीआर काय भानगड नवीन?" मी विचारले.

"पब्लिक रेडिओ! च्यायला नेहमी कान चिकटवून बसलेला असतोस की तूच! काय तर म्हणे ’खरेखुरे आम जनतेच्या हितसंबंधांशी जोडलेले स्टेशन’ म्हणून कौतुक करत असतोस. अरे काय व्होडका प्यालास काय सकाळी-सकाळी?" बिप्याने संधीचा फायदा घेऊन माझ्यावर हल्ला चढवला.

तोंडात मारल्याप्रमाणे मी गप्प बसलो. मला खरे म्हणजे राजकारणात खूप इंटरेस्ट. त्यात मी मुरलेलाच. पण हे सगळे काहीतरी भलतेच चालले होते, आणि मला काही समजत नव्हते. थोडावेळ गप्प बसून त्यांच्या गप्पा ऐकल्यावर माझ्या ध्यानात आले की आगामी निवडणुकीत पंतप्रधान होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांची काल नॅशनल टीव्हीवर दुसरी डिबेट झाली होती, व त्यात मुलायमसिंगने (विरोधी पार्टीचा उमेदवार) कॉंग्रेसच्या मनमोहनसिंगला आतंकवाद या मुद्यावर चांगलेच पिळले होते. आणि सकाळपासून आयपीआर -

म्हणजे इंडियन पब्लिक रेडिओ - नावाच्या चॅनेलवर अनेक प्रोफेसर लोक व इतर तज्ज्ञ लोक या डिबेटसंबंधी उलटसुलट चर्चा करीत होते.

हे सर्व अमेरिकन प्रकार इथे कधी आले? मी खूप वर्षे झोपून होतो की काय? माझी मती गुंग झाली. परिस्थितीचा उलगडा कसा करावा अशा विवंचनेत असताना वेटर टोमॅटो उत्ताप्पा घेऊन आला व स्मित करीत ठेवून गेला. मी नेहमीच उत्ताप्पा घेतो हे त्याला ठाऊक असल्याने तो माझ्या ऑर्डरची वाट न बघता घेऊन आला होता. आनंदाने मी समोर आलेल्या त्या टोमॅटो उत्ताप्यावर तुटून पडलो. किमान बर्गर डोसा तरी खायची पाळी नव्हती आली अजून!

“तरी बरं. इकॉनॉमीच्या चर्चेत त्या इराणी तेलाच्या प्रश्नावर मनमोहनने मुलायमची बोलतीच बंद केली. अर्थशास्त्रज्ञ शोभतो खरा!” पक्या म्हणाला.

“मग मुलायमने खुर्ची फेकून मारली असेल!” मी नकळत खोचक टिप्पणी केली.

सगळे पुन्हा एकदा माझ्याकडे चकित चेहरे करून बघायला लागले.

“दिनकरराव! विनोद असेल तर चांगला आहे. आपण भारतात राहातो, इटलीत नाही. अहो तसले प्रकार आपल्या लोकशाहीत होत नाहीत!” इतका वेळ शांत बसलेला चक्या ऊर्फ रोहित म्हणाला, “मुलायमसिंग एकदम कूल होता, नेहमीसारखाच!”

मुलायम आणि कूल? मी चांगलाच चक्रावलो. थोड्या वेळाने माझा मोबाईल वाजला म्हणून नंबर पाहिला तर प्रिया होती.

“हां हॅलो!” मी हिरवे बटन दाबत बोललो.

“अरे हां हॅलो काय? एका कोणत्या तरी भाषेत बोल ना!” प्रियाला मला चिडवायची भारी हौस.

मी काहीच न बोलल्यावर ती म्हणाली, “बरं, पब्लिक लायब्ररीत भेटूया का? नाही तर जवळचे अमृततुल्य आहेच चहा प्यायला.”

मी थोडा चिडूनच म्हणालो, “पब्लिक लायब्ररी? आता ही कुठनं आली पुण्यात?”

“झोपेत आहेस की काय अजून? अरे आपली सेनापती बापट रोडवरची. नाही का नुकतीच नव्या इमारतीत शिफ्ट झाली ती?” प्रिया मला समजावीत म्हणाली.

मी आता वेडाच व्हायचे बाकी होते.

“तू प्लीज मला इथे घ्यायला ये, मग आपण जाऊ. ड्रायव्हिंगचा कंटाळा आलाय मला.” मी प्रियाला तक्रारीच्या सुरात म्हटले. मला ती लायब्ररी कुठे आहे हे माहित नसल्याचे दाखवायचे नव्हते म्हणून ही सबब.

“ओके. आलेच थोड्या वेळात. वाडेश्वर ना?” प्रियाने यायचे कबूल करत फोन ठेवला. प्रियाचा स्नेहार्द्र आवाज ऐकला आणि झेंडू बाम लावल्याप्रमाणे माझ्या डोक्यातली खळबळ थोडी शांत झाली. प्रिया लाखात एक होती. अशी असामान्य पोरगी आपल्यासारख्या फालतु इसमावर कशी काय फिदा झाली! नशीब बिचारीचे, दुसरे काय?

“ए तू लायब्ररीत चाललायस का? मला ते सरकारचे शिवाजी पुस्तक आणशील का?” दिप्या ऊर्फ दीपांकर मला म्हणाला.

“सरकारचे? आता सरकारी कारकुनांनी पण शिवाजीवर पुस्तके लिहायला घेतली की काय?” मी वैतागून म्हटले.

“अरे बाळ. त्या यदुनाथ सरकारचे पुस्तक म्हणतोय मी,” दिप्या माझ्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाला. त्याला माझा भांग मोडायची वाईट खोड होती. केस विस्कटले की मी जाम वैतागतो, विशेषतः प्रियाला भेटायचे असेल तेव्हा, हे त्याला माहित होते.

१०-१५ मिनिटांनी प्रिया तिच्या गर्द जांभळ्या ड्रेसमध्ये अवतरली. सुडौल बांधा, निमसावळ्या चेहऱ्यावर कायम एक मंद स्मित, बोलक्या भुवया, आणि मिश्कील बदामी डोळे. हलक्या झुळुकेवरही तिचे रेशमी पिंगट केस सहज भुरभुरायचे. माझ्यासाठी तरी प्रिया मिस इंडियाच होती. तिचा पेहराव, तिचे चालणे, बोलणे कशातच खोट दाखवणे अशक्य होते. इंग्लिशमधे आपण proper म्हणतो ना, अगदी तशी होती प्रिया.

“चल तू मला घेऊन लगेच. हे लोक काय ते डिबेट आणि आयपीआर वरून मला फार छळताहेत,” मी प्रियाला विनवले.

प्रियाला आमच्या ग्रूपमधे खूप मान होता. कमरेवर हात ठेवीत ती आमच्या टेबलाजवळ उभी राहिली, व लगेच आमच्या कंपूला उद्देशून म्हणाली, “लोक हो! का तुम्ही साहेबांना उगाच त्रास देताय? तब्येत थोडी नरम आहे आज.” आणि असे म्हणून सर्वांच्याबरोबर खळखळून हसली.

“जा, त्याला जरा सभ्य लोकांच्यात घेऊन जा. कसली कसली मागासलेल्या जमातींची स्वप्ने पडताहेत त्याला!” पक्या पचकला.

प्रियाच्या मारूती झेनमधे बसून आम्ही निघालो. प्रिया कमालीच्या सफाईने गाडी चालवू लागली. फर्ग्युसनवरून बीएमसीसी रोड व तिथून लॉ कॉलेज रोड असे करीत ती अंतर सपासप कापू लागली. आश्चर्य म्हणजे तिला कुणीच सायकलवाले, फेरीवाले, किंवा चालणारे देखील आडवे आले नाहीत! अर्थात या आश्चर्याला आता मी सरावलो होतो. मला आश्चर्य याचे वाटले की प्रियाला या प्रकाराचे काहीच वाटत नव्हते! जणू काही हे तिला नेहमीचेच होते.

आम्ही “जयंत नारळीकर सार्वजनिक ग्रंथालय” च्या भव्य इमारतीसमोर थांबलो. मुबलक पार्किंगची जागा, पण ती स्कूटर आणि गाड्यांनी खचाखच भरलेली, आतबाहेर करणाऱ्या आया-मुलांची मंडईतल्यासारखी भाऊगर्दी, पण सगळे काही शांतपणे, धक्काबुक्की न करता चाललेले. हे सगळे पाहून माझ्या जबड्याचा ’आ’ कायमचा वासतो की काय असे मला वाटू लागले. सकाळी उठल्यापासून अनुभवत असलेले अमेरिका आणि भारत यांचे हे पूर्णपणे अनोळखी आणि अनपेक्षित, पण सुरेख मिश्रण आता हळूहळू माझ्या अंगवळणी पडू लागले होते.

“प्रिया, तुला आठवतेय? आपण कॅलिफोर्नियात असताना फ्रीमॉन्टच्या लायब्ररीत असे बऱ्याचदा जायचो ते? अशीच होती नाही ती?” मी म्हटले.

“ऑफ कोर्स आठवतेय. तू पुस्तकांच्याऐवजी माझ्याचकडे पाहात असायचास कायम,” प्रिया हसत उद्‍गारली.

“हो! पण, पुण्यात अशी लायब्ररी ...” मी वाक्य अर्धवट सोडून दिले व म्हटले, “इथे नको, आपण चहा पिऊ चल.”

“हरकत नाही. ओंकारेश्वर अमृततुल्यमध्ये जाऊ. आतल्या दरवाजानं जाऊ आपण. मला एक-दोन पुस्तकं परत करायचीत.” प्रिया गाडीचे दार उघडून बाहेर पडलीदेखील. प्रिया माझ्या अगदी उलट स्वभावाची होती. मी म्हणजे खूप विचार करून मग एखादी छोटी कृती करणारा (म्हणजे इतरांच्या मते “संथ”) तर प्रिया एकदम डायनॅमिक. फटाफट निर्णय घेऊन मोठी कामे देखील झटपट उरकणारी. मी मुकाट्याने तिच्या मागोमाग गेलो.

पुस्तकं परत करण्याच्या मशीनच्या घशात पुस्तकं ढकलल्यावर प्रिया माझा हात धरून मला आत घेऊन गेली. आज मला लहान मुलासारखे बोट धरून न्यायची गरज आहे हे तिने intuitively अचूक ओळखले होते.

खरोखरंच एखाद्या लहान मुलासारखा तिच्या पाठोपाठ चालत मी आतले प्रचंड बुकशेल्फ पाहू लागलो. "ब्रिटिशपूर्व साहित्य", "निनावी लेखन", "भाषांतरे", अशा अनेक पाट्या मला दिसल्या. "बाबुराव अर्नाळकरांचा" मोठ्ठा सेक्शन पाहून मी चकित झालो.

“अरे एकदम टीनेज सेन्सेशन आहेत त्यांच्या कादंबऱ्या!” प्रिया माझी नजर हेरत म्हणाली.

मग पुढे इंग्लिश पुस्तकांचे डोंगर दिसू लागले. मी रेंगाळतोय असे पाहिल्यावर “अरे काय तेच तेच परत पाहात बसशील” असे म्हणत प्रिया मला ओढतच “ओंकारेश्वर अमृततुल्य” अशी नक्षीदार पाटी लावलेल्या दाराकडे घेऊन गेली. मी पाहातच राहिलो. लायब्ररीला लागूनच (किंबहुना तिच्याच परिसरात) “स्टारबक्स”ला लाजवेल अशा मोठ्या अलिशान आणि सुशोभित दालनात लहानथोर चहा पीत बसले होते. चहाचा भला थोरला मेनू सर्व भिंतींवर लावला होता आणि त्यात अमृततुल्य चहाचे वेगवेगळे फ्लेवर्स दिले होते. मी कुतुहलाने वाचले तर मला "पुणेरी अमृततुल्य", "लखनवी अमृततुल्य", "कश्मिरी मीठी चाय" अशी नावे दिसली. एव्हढेच काय, "हिरवा चहा" आणि "सडपातळ अमृततुल्य" असली दोन-चार नावे होती.

"सडपातळ अमृततुल्य?" मी जवळजवळ ओरडलोच.

माझा गोंधळलेला चेहरा पाहून प्रिया म्हणाली, "अरे सडपातळ अमृततुल्य म्हणजे लोफॅट. म्हणजे स्किम मिल्क असते, बाकी सगळे तेच! आजोबा लोक आणि माझ्यासारख्या मजबुत लोकांसाठी आहे ते!"

प्रिया आणि मजबुत? मी त्या निमित्ताने प्रियाला वरखाली न्याहाळून घेतले. छे! तिच्या अंगावरचा प्रत्येक तोळा मला हवासा होता. माझ्या नजरेला थोपवून धरत प्रिया म्हणाली, "हं चल आता. चहा ऑर्डर करू."

“दोन इलायची अमृततुल्य. कटींग. आणि एक बटाटेवडा.” असे प्रिया काऊंटरपाशी म्हणाली.

कटींग आणि अशा दुकानात? आता काऊंटरवाला नक्की हिला हसणार, असे वाटून मी शरमेने इकडेतिकडे पाहू लागलो. पण कुठले काय. तिथे उभ्या असलेल्या तरूण पोराने “हो नक्की. हा घ्या बिल्ला. आणि कुठेही बसा. चहा येईलच ५ मिनिटांत,” असे म्हणून खण्ण असा कॅश रजिस्टरचा आवाज करीत प्रियाचे पैसे ठेवून दिले.

आता कुठले विलायती मशीन आपला चहा बनवतेय हे पाहायला मी मान उंचावून मागच्या बाजूला पाहिले तर काय! तीन-चार भल्या थोरल्या कढयांत वेगवेगळ्या रंगांचा चहा खदखदत होता व प्रत्येक कढईशेजारी शुभ्र धोतर घातलेले प्रशस्त भय्या लोक मोठ्या चमच्यांनी मसाले ओतत होते व चहा ढवळत होते. आणि त्यांच्या मागे "ओंकारेश्वर भवनचे" स्वच्छ युनिफॉर्म घातलेली पोरंपोरी रिकाम्या कपांचे ट्रे घेऊन उत्कंठेने पण शांतपणे वाट पाहात उभी होती.

ते मनोरम दृश्य पाहून माझ्या जिवात जीव आला. चला, खरंच अमृततुल्य चहा मिळणार तर!

एका आरामशीर सोफ्यावर विराजमान झाल्यावर मी प्रियाला म्हटले, “अगं ही सगळी कॉफीची दुकाने कुठे गेली? बरिस्टा, सिसिडी?”

“आहेत की ती पण. पण अमृततुल्यला पर्याय नाही. आजकाल ओस पडलीयत ती कॉफीची महागडी दुकाने.”

गरमगरम आणि खरोखर अमृततुल्य असा तो चहा मी घुटके घेत बसलो, व प्रिया वड्याचे तुकडे तिच्या नाजूक ओठातून आत ढकलत मला न्याहाळत राहिली. तिच्या नजरेत स्नेह तर होताच, थोडी काळजी पण दिसली.

अचानक एका चालत जाणाऱ्या इसमाचा धक्का लागून माझ्या कपातले एक-दोन थेंब खाली सांडले. “दिसत नाही काय रे” अशी मी शिवी घालणार तेव्हढ्यात तोच प्राणी म्हणाला, “ओ आयॅम सो सॉरी! माफ करा चुकून झाले.” आणि चक्क तो धावत गेला व एकदोन पेपर नॅपकिन आणून ते थेंब पुसू लागला. मी निरखून पाहिले की कोणी परदेशी गोरा तर नाही ना. पण छे! चांगला मिशीवाला सणसणीत भारतीय बंधू होता.

तो इसम खजिल चेहऱ्याने मान हलवत गेल्यावर मी म्हणालो, “प्रिया, पाहिलेस? एव्हढी कर्टसी. अजब माणूस आहे यार! अनबिलिव्हेबल!”

“अरे दिनकर, त्यात काय एवढे. त्याने बरोबरच केले. आणि त्याच्या जागी कुणीही असेच केले असते.” प्रिया तिच्या रेखीव भुवया उंचावत माझ्याकडे पाहात म्हणाली. तिच्या नजरेच्या जादूमुळे माझी अस्वस्थता काहीशी निवळली.

चहा झाल्यावर प्रिया मला प्रभात रोडच्या गार्डन वॉकवर घेऊन गेली. गाडी पार्क करून (हो! तिथे चक्क पे पार्कींगची सोय होती आणि क्रेडिट कार्ड वापरून पैसे भरायचे मशीन होते!) आम्ही कॅनॉल पार्ककडे चालू लागलो.

आता दुपारचे बारा वाजून गेले होते. केवळ भारतातच ऐकू येणारी मध्यान्हीची निःशब्द शांतता पसरली होती. जवळच्या निलगिरीवरच्या कावळ्याची कावकाव आणि दूरवरच्या चहाच्या टपरीवरून हेलकावत येणारे लताचे "अब रात गुजरने वाली है" या गाण्याचे सूर ह्यांच्या सान्निध्यात ती शांतता अजूनच प्रकर्षाने जाणवत होती.

प्रिया माझा हात धरून मला त्या माझ्या अत्यंत आवडीच्या सुरम्य शांत ठिकाणी घेऊन गेली. आमच्यासारखी अनेक जोडपी तिथे बागडत होती.

थोडे अंतर गेल्यावर प्रिया थांबली व माझ्याकडे वळून पाहात म्हणाली, “दिनकर, तू ठीक आहेस ना? असा गोंधळलेला का आहेस? काय झाले आहे तुला?”

मी तिच्या टपोऱ्या डोळ्यांकडे पाहात तिच्या खोल नजरेचा वेध घेऊ लागलो. प्रिया माझ्यापेक्षा दोन-तीन इंच लहान होती. माझ्याविषयीचे प्रेम, आपुलकी, काळजी असे सर्व भाव तिच्या गोल रेखीव चेहऱ्यावर दाटून आले होते. तिच्या नाजूक त्वचेवर अगदी सूक्ष्म थरथरणारे घर्मबिंदू जमा झाले होते. तिचे बदामी डोळे अजून गर्द तपकीरी झाले होते. मला काही कळायच्या आतच तिने माझा चेहरा जवळ खेचला व तिचे ओठ माझ्या ओठांजवळ आणले. 'प्रिया? आणि आपणहून माझे चुंबन घेतेय? ते देखील एका पब्लिक पार्कमध्ये?' असे विचारांचे वादळ माझ्या डोक्यात घुमू लागले व मी चमकून थोडा मागे सरकलो.

"अरे लाजतोस काय असा? इथे कोण पाहतेय तुझ्याकडे? सर्वांनाच कामे आहेत आपापली," प्रिया मिश्किलपणे म्हणाली.

"अगं पण इथे? आपले ते अहोरात्र पाळतीवर असणारे संस्कृतीरक्षक गुंड अचानक आले आणि त्यांनी त्रास दिला तर?" मी प्रियाला थोपवण्याचा प्रयत्न करत म्हटले.

"दिनकर, तू कुठल्या जगात आहेस! असले कोण कशाला त्रास देतील? रोमान्स हा मूलभूत हक्क आहे आपला!" प्रिया अजून जवळ सरकत समजावणीच्या सुरात म्हणाली.

मी इकडेतिकडे पाहिले. खरोखरच अनेक जोडपी एकमेकांच्या कवेत उभी राहून गप्पा मारत होती. तरूणच काय, अनेक वयस्क जोडपी पण एकमेकाच्या खांद्यावर किंवा कमरेभोवती हात ठेवून फिरत होती. सगळे निर्धास्त दिसत होते.

कसेबसे धैर्य गोळा करून मी परत प्रियाच्या मिठीत शिरलो आणि नेमकी तेव्हाच मला "दिनू, ए दिनू. अरे दिनकर!" अशी आईची हाक ऐकू येऊ लागली. आधी अस्पष्ट व मग अधिकाधिक जोरजोरात. इथे आई कशी काय आली असे वाटून मी प्रियाला दूर ढकलले व आवाजाच्या दिशेने पाहू लागलो. तर काय!

मी दूर ढकललेले पांघरूण गोळा करीत आई म्हणत होती, "अरे दिनू ऊठ. आज जायचे नाही का मित्रांना भेटायला?"

मी गोंधळून तिच्याकडे व आजूबाजूला पसरलेल्या माझ्या रूमकडे पाहू लागलो. मी जरा भानावर आल्याचे दिसताच ती पुढे म्हणाली, "गिरीशचा फोन येऊन गेला. आणि बरं का. तो जंगली महाराज रस्ता सगळा खणून ठेवलाय. दुसऱ्या वाटेने जा. आणि हो! आज रिक्षावाल्यांचा संप आहे. गाडी घेऊन जा."

आणि मग मला नाना प्रकारचे आवाज ऐकू येऊ लागले - खाली रूक्मिणी भांड्यांचे ताशे घासण्याच्या मिषाने जोरजोरात बडवत होती, शेजारी गॅलरीत उभे राहून मोबाईल फोनवर कुणीतरी कुणाशीतरी तावातावाने भांडत होते, आणि खाली पार्किंगमधे एक गाडी रिव्हर्स घेत होती व ते सगळ्या जगाला कळावे यासाठी बेथोवेनचे जगप्रसिद्ध संगीत कर्कश आणि बेसूर रीतीने वाजवत होती!

“म्हणजे? ते सगळे खरेच स्वप्न होते तर!” उदास होऊन मी पुटपुटलो व माझा मोबाईल फोन उचलला.

“स्वारी उठली की नाही अजून?” प्रियाचा sms स्क्रीनवर चमकत होता. जीवनदान मिळाल्याचा आनंद होऊन मी माझ्या दिनक्रमाला लागलो.

---oooo(((())))oooo---

लेखकः अभय बिंदुमाधव जोशी (abjoshi@yahoo.com), *Last updated: 18 May 2014*

कथेमागची भूमिकाः पुण्याची काही वैशिष्ट्ये आणि अमेरिकेतल्या काही चांगल्या गोष्टी यांचा मिलाफ झाला तर काय बहार येईल, अशा विचारात असताना लेखकाला पडलेले हे स्वप्न!